# महात्मा गांधीजींचे राजकीय विचार

**श्री संजय नाना बागल** सहाय्यक प्राध्यापक,राज्यशास्त्र, आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, सातारा.

---

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी हे केवळ भारतीय राजकारणातील नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक गुढ आणि अगम्य असे नेतृत्व आहे. औद्योगिक संस्कृती आणि प्रबोधनाची विचारधारा यातून निर्माण झालेली विचार चौकट मोडून एका आध्यात्मिक जीवनशैली राष्ट्राच्या व्यवहारासाठी निर्माण करणारे गांधीजी चे नेतृत्व कदाचित पुढच्या जगाच्या रचनेची चाहूल असावे . एकाच वेळी राष्ट्रीय आणि व्यक्तिगत जीवनाला तत्व व शैली देण्याचा त्यांचा प्रयोग केवळ अभूतपूर्व होता. गांधीजींच्या मते राज्य ही एक आपत्ती आहे. मानवीय स्वभावातील दोषामुळे राज्यसंस्थेची निर्मिती झाली. जेव्हा व्यक्तीचा नैतिक विकास पूर्ण होऊ अहिंसेच्या आधार समाजरचना निर्माण होईल तेव्हा राज्याची आवश्यकता राहाणार नाही तोपर्यंत राज्याची आवश्यकता आहे. प्रत्येक व्यक्ती स्वयंशासित असेल. शक्तीच्या जागी नैतिक शक्ती काम करू लागली तर राज्याची आवश्यकता राहणार नाही. गांधीजीनें तत्वत: अराज्यवादी होते. राज्य सत्तेच्या संपूर्ण अभाव असलेली समाजरचना त्यांना आदर्श वाटते. मानवी स्वभावामुळे मर्यादित राज्यसंस्थेत्या अस्तित्वाला मान्यता देतात . कमीत कमी शासन करणारे शासन हेच चांगले शासन असते. यावर महात्मा गांधीजींचा विश्वास आढळतो.

**उदिष्टे :**

1. गांधीजींच्या राजकीय विचारांचे मूल्यमापन करणे.
2. गांधीजींचे राजकीय विचारांचे महत्त्व शोधणे.

**राज्याचा आधार :**

गांधीजींचे संपूर्ण राजकीय विचार त्यांची विकेंद्रीकरणाची स्वराज्याची, व्यक्तिस्वातंत्र्याची आणि सत्याग्रह कल्पना, राष्ट्रवाद इत्यादि सर्व तत्वज्ञान आणि त्यांचे कार्य सत्य, अहिंसा आणि साध्य-साधन सूचिता या तत्त्वांवर आधारलेले आहे.

**धर्म आणि राजकारण याविषयी गांधीजींचे विचार :**

धर्माशिवाय राजकारणाची कल्पना होऊ शकत नाही. गांधीजींच्या राजकारणावर भारतातील धार्मिक विचारांचा खूप खोल ठसा उमटलेला आहे. धर्मपरंपरांचा त्यांच्या विचारावर पगडा होता. टिळकाप्रमाणे गांधीनी धर्माचा वापर राजकारणासाठी केला. टिळकांचे राजकीय उद्देश उघड जाणवतात मात्र गांधीजींचे राजकीय उद्दिष्ट जाणवत नाहीत. गांधीजचे गुरु गोपाल कृष्ण गोखले यांची राजकारणाच्या अध्यात्मीकरण व्हावे या भूमिकेशी सहमत असून भूमिका राजकारणाच्या मुळाशी नेहमी नैतिक मूल्यांचे अधिष्ठान असले पाहिजे. साध्य-साधन शुचिता राजकारणात सत्याची व न्यायाची प्रतिष्ठाना इत्यादि मूलतत्त्वे गांधी विचारात असून हिंदू धर्माचे प्रतीक व परिभाषा असली तरी त्याची धर्मनिष्ठा कोणत्याही विशिष्ट धर्माच्या चौकटीत बसत नाही. गांधी सनातन हिंदू म्हणवून घेत. मात्र सर्व धर्माचा पलीकडे जाऊन धर्मकल्पनेचा शोध घेतला. सगळे धर्म एका सत्यापर्यंत पोचण्याचे मार्ग असून प्रत्येकाला इतरांचा धर्माबद्दल आदर असला पाहिजे. धर्माच्या तोलनिक अध्यानातून सगळे धर्म प्रेमाचाच संदेश देतात. सत्य आणि विवेक यांच्यावर धर्मग्रंथ कधीच मात करू शकत नाहीत. गांधीजींचे वर्णन राजकीय कर्मयोगी आचार्य जावडेकर करतात . धर्माकडे कर्तव्य भावनेने पाहत असल्याने त्यांनी राजकारण आणि धर्म यांना वेगळी मानले नाही.या अर्थानं ते धर्मनिरपेक्ष होते.

**व्यक्तिविकासाला घातक :**

राज्यात काही लोकांच्या हाती सत्ता केंद्रित होते. सर्वसामान्य व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आणि हक्कांवर आक्रमण होते. आधुनिक काळात राज्याचे कार्यक्षेत्र अतिशय व्यापक झाल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर संकटात सापडले. व्यक्तीचा व्यक्ती तत्वावर राज्याकडून आघात होतो. राज्याच्या अन्य मागे जबरदस्ती असते. कोणतेही कार्य जोर जबरदस्तीने केले तर ते आत्मीयतेच्या भावनेतून होत नाही. तात्विकदृष्ट्या गांधीजी टॉलेस्टप्रमाणे अराज्यवादी होते. राजाचा हस्तक्षेप कमीत कमी असावा यावर ती अधिक भर देतात. त्यांचा विरोध राज्य संस्थेकडे सत्ता केंद्रित होण्यात होता आणि राज्यसंस्थे त्यांची टीका मुख्यत: नैतिक आधारावर होती. माणूस हा गांधीजींच्या विचारांचा केंद्रबिंदू होता आणि मानवी स्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य होते. या मानवी स्वातंत्र्यावर, त्यांच्या उपक्रमशीलतेचा आघात करणारा सर्व गोष्टीना त्यांचा विरोध होता. महात्मा गांधीजींच्या मते, समाजामध्ये व्यक्तीची स्वतःच्या इच्छा आणि वासनावर नियंत्रण ठेवू शकते.

तिथे बाह्य सत्तेच्या नियंत्रणाची आवश्यकता नसते. व्यक्ती स्वतःच्या मनावर नियंत्रण ठेवू शकली तरच ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र बनू शकते. बाह्य सत्यचे नियंत्रण व्यक्तिविकासाला घातक असल्याने प्रतिपादन महात्मा गांधीजी केले.

**रामराज्य आणि ग्रामस्वराज्य :**

महात्मा गांधीनी आदर्श राज्याची कल्पना मानताना रामराज्य हा शब्द बऱ्याच वेळा वापरलेला दिसतो. मात्र गांधीजींच्या कल्पनेतील रामराज्याचा रामायणातील राज्यांशी किंवा धर्माधिष्ठित राज्याशी संबंध नाही, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. भारतीय परंपरेनुसार रामराज्य म्हणजे आदर्श राज्य होय. आपले विचार व्यक्त करताना गांधीजी ने अनेकदा पारिभाषिक शब्द वापरतात, पण त्यातील आशय आधुनिक मानावा लागेल. गांधीवादातील रामराज्य म्हणजे ज्या राज्यात व्यक्तिस्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य मानले जाते असे विकेंद्रित लोकशाही व्यवस्था असलेले राज्य होय. ज्या राज्यात उच्च निश्चितता नसेल ,गरीब-श्रीमंत ,स्त्री-पुरुष असा भेद नसेल रामराज्य होय.वंश आणि पंत यावरून भेदाभेद केला जात नसे. ते रामराज्य होय. रामराज्यात सर्व जमीन आणि शासन व्यवस्था लोकांच्या हाती असेल. न्याय त्वरित आणि कमी खर्चात मिळेल. उपासनेचे विचारांचे आणि लेखनाचे स्वातंत्र्य असेल. या रामराज्य तीन कायदे म्हणजे नैतिक नियम असतील. गांधीजींचा या रामराजा समृद्ध , सुखी याने स्वयंपूर्ण गाव असतील. त्यामुळे भारतातून ब्रिटिश निघून गेले. आपले कार्य संपले असे महात्मा गांधीना वाटत नव्हते. भारत स्वतंत्र झाल्यावर कोणता प्रश्न हाती घ्याल असा प्रश्न त्यांना विचारण्यात आलेला होता. तेव्हा गांधीने असे म्हटले होते. अहिंसात्मक राष्ट्ररचना निर्माण करण्याचे कार्य हाती घेईन. ज्या राज्यात प्रत्येक व्यक्तीला निर्भयतेने आणि स्वतंत्रपणे राहता येईल. आशा राज्याची स्थापना करणे ही महात्मा गांधीजींचे स्वप्न होते. एका मध्यवर्ती ठिकाणी 10-20 माणसाने बसून राजकारभार केल्याने लोकशाही निर्माण होत नाही. ती तर प्रत्येक खेड्यातल्या लोकांनी अमलात आणावे असते. महात्मा गांधीनी खेडेगाव हा पायाभूत घटक मानून शासन व्यवस्थेची कल्पना मांडली . खेड्यांना जास्तीत जास्त स्वायत्तता मिळावी, खेड्यांचा कारभार लोकांनी निवडून दिलेल्या पंचायती मार्फत चालवा .खेड्यांनी आपला जिल्ह्याचा कारभार चालवणारी जिल्हा मंडळे निवडावीत. निवडणुकीसाठी उभे राहणारे उमेदवार नि:स्वार्थी भ्रष्टाचारापासून मुक्त आणि चारित्र्यसंपन्न असावेत असा आग्रह होता. त्यांच्यात सेवाव्रती असावी, असे महात्मा गांधीजींचे मत होते. रामराजाप्रमाणे महात्मा गांधीजींचा विचार ग्राम स्वराज्याची कल्पनाही महत्त्वाची मानली होती. स्वयंपूर्ण स्वयंशासित खेडेगावाचा संघ म्हणजे राज्य अशी गांधीजी राज्य संकल्पना होती.

**स्वराज्य आणि लोकशाही :**

हिंसक समाजही अराज्यवादी व्यवस्था आदर्श म्हणून कितीही चांगली असली तरी प्रत्यक्षात ती कठीण असल्याची जाणीव गांधीना होती. त्यास पर्याय म्हणून महात्मा गांधीनी मर्यादित ठेवणारी जागृत व संघटित लोकशाही अशा दुहेरी आधारावर महात्मा गांधी यांची स्वराज्य संकल्पना आधारलेली आढळते. राजकीय स्वातंत्र्यही स्वराज्यासाठी आवश्यक अट त्यांनी सांगितली आणि त्याच हेतूने भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला आपले जीवन समर्पित केले. मात्र स्वराज्य आणि स्वातंत्र्य ही संज्ञा समानार्थी नाही हे महात्मा गांधीनी स्पष्ट केले. युरोपातील अनेक देश स्वतंत्र असूनही तिथे स्वराज नांदत नाही. तळागाळातील व्यक्ती सर्व प्रकारच्या शोषणातून आणि जोखडातून मुक्त होणे म्हणजे स्वराज्य होय. केवळ राजकीय स्वातंत्र्यातून असे स्वतंत्र निर्माण होत नाही. गांधीजी एका बाजूने स्वतंत्र लढायचे नेतृत्व करीत होते तर दुसऱ्या बाजूने खराखुरा स्वराज्यासाठी रचनात्मक कार्यक्रमाची आखणी करीत होते. या रचनात्मक कार्यक्रमामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुनर्रचना अस्पृश्यता निवारण, मूलोद्योगी शिक्षण, किसान कामगार संगठन, साधेपणा व्यसन मुक्ती या कार्यक्रमाचा समावेश होता. शोषणमुक्त श्रमप्रतिष्ठा, भौतिक गरजावर मर्यादा या मार्गाने स्वराज साधना केली जाऊ शकते, असे महात्मा गांधीजी. मत होते. इं.सं 1925 साली स्वराज्याची व्याख्या करताना महात्मा गांधीनी प्रतिनिधीकतेच्या तत्वांवर विशेष भर दिला. ते म्हणतात, स्वराज्याला मला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे लोकांच्या सहमतीने चाललेले हिंदुस्तानचे शासन सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या आधारित ही सहमती व्यक्त झालेली असावी. प्रतिनिधिक शासनाच्या संस्थात्मक बाजूपेक्षा कार्यात्मक नैतिकता महात्मा गांधीने अधिक महत्त्वाची वाटते आणि संसदीय लोकशाहीचा पुरस्कार गांधी मर्यादित काळासाठी आणि काही प्रमाणात केला. महात्मा गांधीनी पाश्चिमात्य लोकशाही फॅसिस्टवादाचे किंवा नाझीवादाचे सौम्य स्वरुप वाटते आणि प्रतिनिधिक संस्था पेक्षा महात्मा गांधीना संघटित लोकशाही महत्त्वाची वाटते.

**सत्याग्रह आणि नि:शस्त्र प्रतिकार :**

सत्याग्रह आणि नि:शस्त्र प्रतिकारही मार्ग महात्मा गांधीनी प्रक्रिया ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढण्यासाठी वापरले. पण हे केवळ लढण्याचे मार्ग नव्हे तर त्यामागे गांधीवादी तत्त्वज्ञान होते. सत्य आणि अहिंसा ही महात्मा गांधींची प्रमुख तत्वे मानली जातात. या तत्वांना अनुसरून त्यांनी सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग, बहिष्कार उपोषण ही लढाईची साधने निर्माण केली. ही सर्व अहिंसात्मक लढाईची साधने होती. सत्याग्रह म्हणजे आग्रह सत्याचा सतत शोध आणि सत्य प्राप्त करून घेण्याची निश्चय होय. या मार्गाचा पहिला प्रयोग गांधींनी दक्षिण आफ्रिकेत केला आणि सत्याग्रहाचा उपयोग करून भारतीय लोकांना स्वातंत्र्याचा लढा यशस्वी करता येईल. असा महात्मा गांधीजींचा विश्वास होता. "हिंद स्वराज्य" या पुस्तकात त्यांनी प्रतिपादन केले की भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न शस्त्रबळाने आणि बौद्धिक चर्चेने सुटणार नसून तो सत्याग्रहाच्या मार्गाने सुटेल . महात्मा गांधीजींचा सशस्त्र क्रांतीला तीव्र विरोध होता. त्यामुळे गांधीजी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे मतभेद होते. महात्मा गांधीजींच्या मते सशस्त्र क्रांतीचा मार्ग आणि स्वतंत्र मिळाले तरी ते सत्ता ही लष्करशाह आणि सरंजामशाहीच्या हाती जाईल आणि सामान्य जनता स्वतंत्रपासून वंचित राहील.

**सत्याग्रह तत्वज्ञान :**

सत्याग्रह केवळ एक अहिंसक शस्त्र नव्हते तर ती एक संकल्पना मानावी लागेल. गांधीजीचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान होय. तशी सत्य आणि अहिंसा ही तत्व नवीन नाहीत. उपनिषदातील तत्त्वज्ञानात सत्य हाच सर्व विश्वाचा आधार मानलेला आहे. गौतम बुद्ध, महावीर वर्धमान यानी मानवाला अहिंसा आणि प्रेम यांची शिकवण दिली. येशू ख्रिस्ताने जगाला दया आणि प्रेम यांची शिकवण दिली. याचा अर्थ महात्मा गांधी नवीन काही सांगितले नाही. महात्मा गांधीजींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी या तत्त्वाचा अवलंब राजकीय लढ्यासाठी केला. सत्य आणि अहिंसा या सनातन तत्वांना महात्मा गांधीनी अन्यायाविरुद्ध लढण्याचे मार्ग बनवले. त्यांना नवा आशय प्राप्त करून दिला. सत्य हे गांधीजींच्या दृष्टीने सर्वांचं नैतिक मूल्य होते. हे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट होते. सत्याग्रह व्यक्तिगत फायद्यासाठी करायचा नसतो. तो नेहमी सार्वजनिक हितासाठी किंवा इतरांच्या हितासाठी करायचा असतो. महात्मा गांधीनी आपल्या दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह या पुस्तकात सत्याग्रहाचे तत्त्व मी अनुभवातून शिकलो असे प्रतिपादन करतात.

**गांधीजी आणि अहिंसा :**

सत्य हे गांधीवादाचे ध्येय आहे तर अहिंसा कडे जाण्याचा मार्ग आहे. तरीही दोन तत्व परस्पर अशी एवढी आहेत की त्यांना एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. गांधीवाद साध्य आणि साधन यात एकरूपता मानलेली आहे. त्यामुळे सत्याएवढेच महत्त्व हिंसेला आहे. व्देशाने, स्वार्थी भावनेने दुसऱ्याला पीडा देणे, त्यांच्यावर शारीरिक हल्ला करणं म्हणजे हिंसा, शारीरिक तसेच मानसिक दृष्ट्या अशा हिंसेपासून अलिप्त राहणे म्हणजे अहिंसा होय . अहिंसेचे पालन करणारा दुसराला क्लेश देत नाही. दुसऱ्याबद्दल व्देषाची भावना बाळगत नाही. अहिंसाव्रताचे पालन करणे अतिशय कठीण असते. भित्रा माणूस अहिंसेचे पालन करू शकत नाही. अहिंसा म्हणजे भ्याडपणा नव्हे, दुर्बलता नव्हे, अहिंसा ही हिंसेबरोबर लढण्याचा मार्ग आहे.

**मूल्यमापन :**

गांधीनी या देशातील आणि विश्वातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय चिंतनाला व कार्याला एक नवीन दिशा दिली आहे. राजकीय प्रश्नाकडे व दैनंदिन अडचणीकडे नैतिक दृष्टीने पाहून बळ आणि हिंसा यांच्या ऐवजी सत्य अहिंसेद्वारे वापरलेले सत्याग्रह साधन राजकीय विचाराच्या क्षेत्रातील मोठी कामगिरी आहे. धर्म, नीती, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा ,शेती कोणतेही क्षेत्र असो, वैयक्तिक आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंत, गावापासून विश्वापर्यंत प्रचंड आवाका गांधीजींचा विचार व्यापलेला आहे.

**संदर्भ साधने :**

**1.** आचार्य जावडेकर, आधुनिक भारत, कॉन्टिनेन्ट प्रकाशन, पुणे.
2. सुमन वैद्य व शांता कोटेकर, आधुनिक भारताचा इतिहास. नागपूर.
3. डॉ. भा. ल. भोळे. आधुनिक भारताचे विचारवंत. पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, (2012) नागपूर.
**4.** डॉ. व. गो. नांदेडकर, राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
**5.** डॉ. दिलीपसिंह निकुभ, भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, (2020) जळगाव.